# ज. ए. इ. ची पूर्व प्राथमिक शाळा

## सुभेदार वाडा, कल्याण (प.)

## वार्षिक अहवाल

### डिसेंबर २०१८ ते डिसेंबर २०१९

सस्नेह नमस्कार

जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटची पूर्व प्राथमिक शाळा, कल्याण (प.) आपला वार्षिक अहवाल सादर करीत आहे.

* १४ नोव्हेंबर १९८४ साली जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटची पूर्व प्राथमिक शाळा, कल्याण येथे सुभेदार वाड्यात सुरू झाली. सध्या शाळेच्या पूर्व प्राथमिक विभागात नर्सरीचे २ वर्ग, छोटा शिशुचे ४ वर्ग, मोठा शिशुचे ४ वर्ग असून एकूण ४५१ विद्यार्थी शिक्षण घेत आहे. ज्येष्ठ शिक्षिका सौ. भाभे नीलिमा नरेश ह्या सध्या शाळेचा कार्यभाग संभाळत आहेत. ७ सहाय्यक शिक्षिका, १ संगीत शिक्षिका, १ लिपिक, ५ सेविका, ५ हंगामी शिक्षिका, १ हंगामी सेविका कार्यरत आहेत. त्यामुळे शाळेचे शैक्षणिक नियोजन व्यवस्थित होते.
* विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी मोठी मोकळी जागा (घारपुरे सभागृह), तसेच स्वच्छता गृह, स्मार्ट बोर्ड, शैक्षणिक साधने व खेळणी या सर्वांचा लाभ विद्यार्थी घेत आहेत तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत.
* १ जानेवारी २०१९ पासून लिपिक सौ. निमकर ऐश्वर्या वैभव यांची बदली इंग्रजी माध्यम शाळा सुभेदार वाडा येथे झाली. सहाय्यक ज्येष्ठ शिक्षिका सौ. निकम सुनिता लक्ष्मण या ३१ मे २०१९ रोजी सेवा निवृत्त झाल्या. १६ सप्टेंबर २०१९ रोजी सौ. देवधर रुचा हृषिकेश यांची लिपिक पदासाठी नेमणूक करण्यात आली. तसेच ३० नोव्हेंबर २०१९ रोजी मुख्याध्यापिका मा. सौ. जांभुळकर रसिका यशवंत निवृत्त झाल्या.
* शाळेत येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार व्हावेत म्हणून विविध सण, उत्सव साजरे केले जातात. उदा. आषाढी एकादशी, रक्षाबंधन, नागपंचमी, दहिहंडी, गोड शुक्रवार, बैलपोळा, भोंडला, संक्रांत - तिळगुळ समारंभ, शेकोटी, रंगपंचमी, होळी इत्यादी तसेच चार महिन्यांनी विद्यार्थ्यांचे सामुहिक वाढदिवस होमहवन करून गायत्री मंत्र म्हणून साजरे केले जातात. जुलै महिन्यापासून दर बुधवारी विद्यार्थ्यांना पौष्टीक खाऊ दिला जातो. वर्षभरात काही महत्त्वाचे शैक्षणिक पाठ विद्यार्थ्यांचे घेतले जातात.
* शनिवार, दि. २२ डिसेंबर २०१८ रोजी वार्षिक स्नेहसंमेलन आचार्य अत्रे रंगमंदिर येथे आयोजित करण्यात आले. विषय : 'टूर निघाली टूर' कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे - कु. नचिकेत श्रीनिवास लेले (गायक - सारेगमप महाविजेता, Zee मराठी), विशेष अतिथी - कु. केतकी कुलकर्णी (बालकलाकार) सोनी मराठी वरील ह. म. बने तु. म. बने (या मालिकेत काम करत आहे. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. शैलेंद्र राजाराम साळवी (कार्याध्यक्ष) ज.ए.इ.दादर, मुंबई यांना आमंत्रित करण्यात आले होते.
* २४ एप्रिल २०१८ रोजी 'श्री विजय श्रीधर कामेरकर' पुरस्कृत "कै. सौ. सुरेखा श्रीधर कामेरकर" "आदर्श शिक्षक" पुरस्कार संगीत शिक्षिका श्रीमती मनिषा श्रीपाद राव यांना प्रदान करण्यात आला. तसेच माजी सहाय्यक शिक्षिका सौ. कुलकर्णी सुनिती श्रीकांत यांनी आपल्या दोन्ही मुलांच्या कै. संतोष श्रीकांत कुलकर्णी व कै. मंदार श्रीकांत कुलकर्णी यांच्या स्मृती प्रित्यर्थ शाळेच्या व विद्यार्थ्यांच्या

विकासासाठी प्रयत्नशील शिक्षिकेला पारितोषिक देण्यात येते. २२ डिसेंबर २०१८ मध्ये या पारितोषिकाच्या मानकरी ठरल्या श्रीमती देवळे वैशाली विवेकानंद यांचे शाळेच्या वतीने हार्दिक अभिनंदन !

* सोमवार दि. ७ जानेवारी २०१९ रोजी शाळेच्या वेळेत क्रीडास्पर्धा घेण्यात आल्या. क्रीडास्पर्धा नर्सरी, छोटा शिशु व मोठा शिशुच्या सर्व विद्यार्थ्यांच्या घेण्यात येतात.
* बुधवार दि. १६ जानेवारी २०१९ रोजी नर्सरी, छोटा शिशु व मोठा शिशुच्या सर्व विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आला.
* स्त्री शिक्षण मंडळातर्फे शनिवार दि. १९ जानेवारी २०१९ रोजी झालेल्या कार्यक्रमात मोठ्या शिशुच्या गट क्र. १ मधील विद्यार्थ्यांनी 'बंगाली नृत्य' सादर केले म्हणून सहभागाबद्दल विद्यार्थ्यांना मेडल देऊन कौतुक करण्यात आले. शाळेतर्फे विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन !
* बुधवार दि. ३० जानेवारी २०१९ रोजी नर्सरी, छोटा शिशु व मोठा शिशुची 'पुष्कर मेळा' येथे सहल काढण्यात आली.
* शनिवार दि. २ फेब्रुवारी २०१९ रोजी शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी संघाचे स्नेहसंमेलन मो. ह. विद्यालय, ठाणे येथे संपन्न झाले.
* जानेवारी महिन्यात नर्सरी, छोटा शिशु, मोठा शिशु विद्यार्थ्यांना परिसराची ओळख व्हावी म्हणून अक्षत गणपती व पारनाक्यावरील मंदिरे तसेच कुंभार वाडा येथे नेण्यात आले.
* पालक-शिक्षक संघातर्फे विद्यार्थ्यांच्या स्पर्धा १५ फेब्रुवारी २०१९ रोजी शाळेच्या वेळेत घेण्यात आल्या. स्पर्धांचे परिक्षण करण्यासाठी पालक-वर्ग प्रतिनिधींना आमंत्रित करण्यात आले.
* चिन्मय मिशन तर्फे घेण्यात आलेल्या 'गीतापठण' स्पर्धेमध्ये छोटा शिशु गट क्र. २ मधील कु. धोंगडे प्रथमेश संतोष या विद्यार्थ्याला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले. शाळेच्या वतीने त्यांचे हार्दिक अभिनंदन !
* मार्च महिन्यात मोठा शिशु विद्यार्थ्यांना निरोप समारंभ कार्यक्रम करण्यात आला. विद्यार्थ्यांना शाळेकडून खाऊ देण्यात आला व पालकांना मा. मुख्याध्यापिका सौ. जांभुळकर रसिका यशवंत यांच्याकडून सरबत देण्यात आले. तसेच पालकांनी शाळेला स्टिलच्या डिश व वाट्या भेट म्हणून दिल्या.
* मार्च महिन्यात नर्सरीच्या विद्यार्थ्यांचा आनंदोत्सव साजरा करण्यात आला व सर्व विद्यार्थ्यांना आईस्क्रिम देण्यात आले.
* छोटा शिशु व मोठ्या शिशुच्या वार्षिक तोंडी व लेखी परीक्षा २७ मार्च २०१९ ते ५ एप्रिल २०१९ या कालावधीत घेण्यात आल्या. नर्सरीच्या विद्यार्थ्यांचा वार्षिक निकाल शुक्रवार दि. २९ मार्च २०१९ रोजी देण्यात आला. तसेच छोटा व मोठ्या शिशुचा वार्षिक निकाल गुरुवार दि. २६ एप्रिल २०१९ रोजी देण्यात आला.
* गुरुवार दि. १३ जून २०१९ पासून सन २०१९-२०२० चे शैक्षणिक वर्ष सुरु झाले.
* स्कूल हेल्थ ॲन्युअल रिपोर्ट प्रोग्राम यांच्या सौजन्याने SHARP NGO च्या स्ट्रेट कोऑर्डिनेटर ऑफ महाराष्ट्र यांच्या तर्फे विद्यार्थ्यांना बूट वाटप करण्यात आले.
* सार्वजनिक गणेशोत्सव सुभेदार वाडा मंडळाला यंदा १२५ वर्ष पूर्ण झाली. या निमित्त गणपती स्तोत्र (मराठी) पाठांतर स्पर्धा घेण्यात आली. सदर स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांना पारितोषिके मिळाली.
  प्रथम क्रमांक : कु. जोगळेकर सानिका शंतनु (मोठा शिशु गट ४)
  द्वितीय क्रमांक : कु. सोनावणे पूर्वा राहुल (मोठा शिशु गट ४)
  तृतीय क्रमांक : कु. नानल चैतन्य अमोल (मोठा शिशु गट २)
* शुक्रवार दि. ९ ऑगस्ट रोजी क्रांतीदिन व आदिवासी दिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी विविध क्रांतीवीरांच्या व आदिवासी वेशभूषा करून कार्यक्रम सादर केला.

* नवनीत मास्टर स्ट्रोक, कॅमलिन, गीतापठण अशा विविध बाह्य स्पर्धा शाळेत घेतल्या जातात. तसेच चिन्मय मिशन गीतापठण स्पर्धेमध्ये दुसऱ्या फेरीपर्यंत विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.
७ ऑगस्ट रोजी झालेल्या नवनीत तर्फे मास्टर स्ट्रोक चित्रकला स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे -

छोटा शिशु :- कु. पालेकर तनिषा दिनेश (गट ३) कु. पाटील कनिष्का अरूण (गट ४)
कु. गोसावी अनुराग संजय (गट १) कु. नाईक प्रसाद सिध्दार्थ (गट २)

मोठा शिशु :- कु. पाटील कार्तिक दयानंद (गट १) कु. जोगी भाग्यश्री प्रदिप (गट २)
कु. भाटगावे अनन्या शिवाजी (गट ३) कु. सोनावणे पूर्वा राहुल (गट ४)

तसेच नवनीत मास्टर स्ट्रोक यांनी मा. मुख्याध्यापिका सौ. रसिका यशवंत जांभुळकर, सौ. जयश्री अशोक सोनार (सहाय्यक शिक्षिका) व सौ. सुवर्णा मारूती पाटील (सहाय्यक शिक्षिका) यांनीही स्पर्धेचे काम उत्तम प्रकारे केले. त्याबद्दल बक्षिसे देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.

* पालक शिक्षक संघातर्फे ३० ऑगस्ट २०१९ रोजी माता पालकांच्या गोलात रिंग टाकणे स्पर्धा घेण्यात आल्या. विजेत्यांची नावे पुढील प्रमाणे -

प्रथम क्रमांक : सौ. जाधव अश्विनी गणेश द्वितीय क्रमांक : सौ. गायकवाड कामिनी मंगेश
तृतीय क्रमांक : सौ. शेख अखिला अशपाक उत्तेजनार्थ : सौ. साबळे जयश्री विशाल

विजेत्यांचे शाळेतर्फे हार्दिक अभिनंदन !

तसेच नर्सरीच्या वर्गात मातृदिन साजरा करण्यात आला. संगीत शिक्षिका मनिषाताईंनी 'आई' या विषयावर गाणी सादर केली व विद्यार्थ्यांनी आईचे पूजन व औक्षण केले.

* ३१ ऑगस्ट रोजी LIC तर्फे घेण्यात आलेल्या रंगभरण स्पर्धेचा बक्षिस समारंभ संपन्न झाला. बक्षिसपात्र विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे -

छोटा शिशु - प्रथम क्रमांक - कु. बोडके अर्पित निलेश द्वितीय क्रमांक - कु. माळी पूर्वांश दिनेश
तृतीय क्रमांक - कु. सोनावणे तुषार राजेंद्र उत्तेजनार्थ -कु. लोखंडे तनिष्क दिनेश

मोठा शिशु - प्रथम क्रमांक - कु. माळी स्वरूप जगदिश द्वितीय क्रमांक -कु. जठार ज्ञानदा दिपक
तृतीय क्रमांक - कु. जोगळेकर सानिका शंतनु उत्तेजनार्थ - कु. भोईर यज्ञा संतोष

नर्सरीच्या सर्व विद्यार्थ्यांना LIC तर्फे वॉटरबॅग बक्षिस स्वरूपात देण्यात आल्या.

तसेच २०१८-१९ या वर्षीचा **Student of the year** चा मान मोठा शिशु गट - ३ कु. सोनावळे आदित्य अमोल या विद्यार्थ्याला मिळाला.

तसेच शाळेला **Bima School Hattrick** हा पुरस्कार प्राप्त झाला. शाळेतर्फे सर्व विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन !

* बुधवार दि. ११ सप्टेंबर २०१९ रोजी 'शिक्षक दिन' साजरा करण्यात आला. या निमित्त स्ट्रॅाने वाटाणे उचलणे (वेळ १ मि.) ही स्पर्धा घेण्यात आली.

या स्पर्धेतील विजयी स्पर्धक - प्रथम क्रमांक :- सौ. पुराणिक अर्पणा प्रशांत
द्वितीय क्रमांक :- सौ. भाभे नीलिमा नरेश
तृतीय क्रमांक :- श्रीमती राव मनिषा श्रीपाद

विभागून { उत्तेजनार्थ :- सौ. चौधरी दिपाली संतोष
उत्तेजनार्थ :- सौ. महाजन अश्विनी अविनाश }

उत्तेजनार्थ बक्षिसे मा. मुख्याध्यापिका सौ. रसिका जांभुळकर यांच्या तर्फे देण्यात येतील.

* मंगळवार दि. २४ सप्टेंबर २०१९ रोजी महिला पालकांसाठी व विद्यार्थ्यांसाठी कागदी वस्तूंचे प्रशिक्षण (पेपर वर्कशॉप) घेण्यात आले. कागदी पिशव्या व टाकावूतून टिकावू वस्तू बनविणे तसेच विद्यार्थ्यांना हस्तकलेचे प्रशिक्षण देण्यात आले व सर्व वस्तूंचे प्रदर्शन २५ सप्टेंबर रोजी मांडण्यात आले. प्रशिक्षणासाठी विद्यार्थी व पालक यांचा सहभाग उत्कृष्ट होता. संस्थेचे संचालक मंडळ सदस्य मा. श्री. नंदकुमार इनामदार सर यांनी ५००/- बक्षिस देऊन शिक्षकांना प्रोत्साहन दिले.
* शुक्रवार दि. ४ ऑक्टोबर २०१९ ते मंगळवार दि. ८ ऑक्टोबर २०१९ पर्यंत शारदोत्सव साजरा करण्यात आला. शनिवार दि. ५ ऑक्टोबर रोजी LIC तर्फे फक्त महिला पालकांसाठी वैद्यकिय तपासणीचे आयोजन करण्यात आले.
* गुरुवार दि. १० ऑक्टोबर २०१९ ते १८ ऑक्टोबर २०१९ या कालावधीत छोटा व मोठा शिशुची प्रथम सत्र परीक्षा घेण्यात आली.
* गुरुवार दि. १४ नोव्हेंबर २०१९ रोजी शाळेच्या वेळेत बालदिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साधने खेळण्यास दिली.
* गुरुवार दि. २२ नोव्हेंबर २०१९ रोजी डोंबिवली 'भोपर' येथील अंगणवाडी शाळेला पालक आणि शिक्षक यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांना पुस्तके दिली.
* आभार - मा. श्री. प्रफुल्ल अनंत गवळी साहेब (अनंत हलवाई) यांनी मोठ्या शिशु वर्गातील मोहम्मद अता उस्मान बेग या गरजू विद्यार्थ्यांची फी भरली (३५००/-) त्याबद्दल शाळेच्या वतीने त्यांचे हार्दिक आभार.
* नर्सरी वर्गातील कु. चौबे आनंद जयकृष्ण या गरजू विद्यार्थ्यांची फी (२५००/-) हायस्कूल कल्याणचे ज्येष्ठ शिक्षक मा. श्री. कुलकर्णी वेदांत सुधाकर यांनी भरली. त्याबद्दल शाळेच्या वतीने त्यांना धन्यवाद !
* दुर्वांकुर गणेश मंडळ (सार्वजनिक गणेशोत्सव सुभेदार वाडा, कल्याण) या मंडळाने (ॲल्युमिनिअम धातूची) शिडी शाळेला भेट म्हणून दिली. त्याबद्दल शाळेच्या वतीने आभार !
* LIC कडून शाळेला भेट स्वरूपात २ मोठ्या सतरंज्या व १ लहान सतरंजी देण्यात आली. त्याबद्दल शाळेच्या वतीने हार्दिक आभार !
* छोटा शिशु वर्गातील कु. अनन्या सचिन बोटेकर हिच्या वाढदिवसानिमित्त शिक्षिकांना तुळशीचे रोप देऊन सन्मानित करण्यात आले. त्याबद्दल शाळेच्या वतीने श्री. सचिन बोटेकर यांचे आभार !
* पालक - शिक्षक संघ व शाळा व्यवस्थापन समितीतील पालक प्रतिनिधींचे शाळेच्या प्रगतीसाठी वेळोवेळी साहाय्य लाभते. शाळेच्या प्रेमापोटी सर्व हितचिंतक, आजी-माजी पालक शाळेच्या प्रगतीसाठी उत्तम प्रकारे सहकार्य करतात. शाळा सर्वांची ऋणी आहे.

  अशा विशाल वटवृक्षाला समृध्दी आणि यशाच्या उत्तुंग शिखराकडे वाटचाल करण्यासाठी संस्था, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व आपले बालगोपाळ सतत प्रयत्नशील असतात. त्यांना सुयश मिळो ही ईश्वरचरणी प्रार्थना !

  धन्यवाद !

(ज्येष्ठ शिक्षिका)

**सौ. भाभे नीलिमा नरेश**

ज. ए. इ. ची पूर्व प्राथमिक शाळा, कल्याण (प.)

संकलन : सौ. पुराणिक अपर्णा प्रशांत (सहाय्यक शिक्षिका)
सौ. भाभे नीलिमा नरेश